जा.क्र./उविमप्र/तेलताड/ 759 /२०२०
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग
दि. 15 MAY 2020

प्रति,

..................................
..................................
..................................

**विषय: प्रति तास तत्त्वावर जे. सी. बी.** (Hydraulic Excavator (Wheeled) 0.3 Cum किंवा Loader 1 Cum bucket capacity) **भाडयाने घेणेबाबत दरपत्रक पुरविणेबाबत...**

महाशय,

उद्यानविद्या महाविद्यालय मुळदे, ता. कुडाळ, अंतर्गत तेलताड प्रक्षेत्रावर भाडे तत्त्वावर जे. सी. बी. मार्फत काम करुन घ्यावयाचे असून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजित कामाचे तास | शेरा |
|---|---|---|---|
| १. | भाडेतत्वावर जे. सी. बी. मार्फत कामे करून घेणे (झाडे लावावयाच्या जागेतील झुडपे काढुन आवश्यक त्या ठिकाणी जमिनीचे सपाटीकरण करणे व ३५० खड्डे २X२X २ फुट आकाराचे खोदणे) | एकुण ५० तास | जे. सी. बी. (Hydraulic Excavator (Wheeled) 0.3 Cum किंवा Loader 1Cum bucket capacity) प्रति तासाचा दर नमूद करावा. |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे दर नमुद करून दरपत्रक या कार्यालयात **दि.२१/०५/२०२०** पर्यत या कार्यालयास प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर " **भाडयाने जे. सी. बी पुरविणेबाबत दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग – ४१६५२० या पत्यावर पोस्टाने किंवा हात बटवडयाने दयावे.
३) दरपत्रकात दिलेला दर हा सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावा तसेच सदरचा दर हा शासन परिपत्रक क्र. रादसू –२०१८/प्र. क्र. २७/नियोजन–३ दि. २७/०७/२०१९ मध्ये नमुद सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१९–२० साठी राज्य दरसूचीमधील नमुद दराच्या अधिन असावा.
४) दरपत्रकात या पत्राचा संदर्भ नमुद करावा.
५) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
७) दरपत्रकांवर जी. एस. टी. नंबर नमुद करावा.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग